संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# आता सीबीआयचीच चौकशी व्हायला हवी

**भारताच्या** सर्वात मोठ्या किंवा मध्यवर्ती तपास यंत्रणेविषयी देशाच्या एका प्रमुख मंत्र्यानेच जाहीरपणे तक्रार करावी याचा अर्थ या तपास यंत्रणेच्या रचनेत आणि कार्यपध्दतीतच मूलभूत दोष असल्याचेच स्पष्ट होते. केंद्रीय गुप्तचर विभाग म्हणजेच सीबीआय ही तपास यंत्रणा गेल्या दोन महिन्यापासून अधिक वादग्रस्त ठरली आहे. याच विभागाच्या महासंचालकावर दुसऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्याने थेट लाचखोरी केल्याचा आरोप करणे किंवा या दोघांच्याही भांडणामधून सीबीआयच्या कारभाराची लक्तरेच वेशीवर टांगली जाणे असा अभूतपूर्व प्रकार अलिकडेच घडला. अखेर पंतप्रधानांना लक्ष घालावे लागले आणि ज्या महासंचालकावर लाच घेतल्याचा आरोप झाला होता त्याला तातडीने हटवावे लागले. सर्वोच्च न्यायालयाने जरी त्या महासंचालकाच्या पुनर्नियुक्तीचे आदेश दिले असले तरी पंतप्रधानांच्याच अध्यक्षतेखाली असलेल्या त्रिसदस्यीय समितीने याच महासंचालकाची बदली करण्याचीही शिफारस केली. ही बदली न स्वीकारता संबंधित महासंचालकाने राजीनामा देणे पसंत केले हा सगळा घटनाक्रम ताजा असतानाच ज्या अधिकाऱ्याने आरोप केले होते. त्याचीसुध्दा अन्यत्र बदली केली गेली. याचा अर्थ सीबीआयचे वरिष्ठ अधिकारी एवढ्या मोठ्या तपास यंत्रणेचा किती मनमानी पध्दतीने गैरवापर करू शकतात. हेदेखील स्पष्ट झाले होते. आता आयसीआयसीआय बँकेच्या माजी अध्यक्षा चंदा कोचर यांच्या गैरव्यवहारप्रकरणाची चौकशी करताना सीबीआयने देशातील काही प्रमुख किंवा प्रतिष्ठित बँकर्स विरुध्दसुध्दा कारवाईचे संकेत दिले. त्या प्रतिष्ठितांची यादी वाचल्यानंतर अर्थमंत्री अरुण जेटली यांची तळपायातली आग मस्तकात गेलेली दिसते. अमेरिकेत उपचारासाठी गेलेल्या जेटलींनी ट्विटरवरून सीबीआयच्या कार्यपध्दतीवर तीव्र आक्षेप घेतले आहेत आणि ज्यांच्याविरुध्द पुरावा नाही. त्यांची नावे गोवून सीबीआय बँकींग व्यवस्थेवर आघात करीत असल्याचा आरोपही केला. म्हणजे सीबीआयमधल्या दोन बड्या अधिकाऱ्यांच्या सुंदोपसुंदीनंतर या विभागाचे वाभाडे तर निघालेच. आता सरकारमधल्या एका ज्येष्ठ मंत्र्यांनी सीबीआयला दोषी ठरवल्यामुळे केंद्र सरकारच्या अखत्यारीत असलेल्या आणि पंतप्रधानांनी लक्ष घालूनही कामात सुधारणा न झालेल्या सीबीआयच्या कामाविषयी अनेक शंका निर्माण होतात. जिथे पंतप्रधान सीबीआयच्या कामात सुधारणा करू इच्छितात त्याच सीबीआयला अर्थमंत्र्यांनीच पूर्ण दोषी ठरवल्यामुळे आणखीनच नवा गुंता वाढल्यासारखे झाले आहे.

### जेटलींच्या संतापाचे कारण

ज्या कारणांमुळे अरुण जेटली संतप्त झाले किंवा ज्या कारणांमुळे त्यांनी सीबीआयला दोषी ठरवले आहे. तो प्रकारदेखील नीट समजून घेतला पाहिजे. सीबीआयच्या कार्यपध्दतीत दोष आहेतच यात काही शंका नाही. परंतु त्यांनी काही प्रतिष्ठित बँकर्सची नावे घेतल्यामुळे सीबीआय दोषी ठरत असेल तर मात्र तो प्रकार एकतर्फी किंवा एकांगी म्हणावा लागेल. बडे बँकर्स किंवा बडे बँक अधिकारी आहेत. म्हणजे ते धुतल्या तांदळासारखे स्वच्छ आहेत असे समजण्याचे कारण नाही उलट अशा बड्या अधिकाऱ्यांमुळेच अनेक गैरव्यवहारही घडत आले आहेत ज्यांच्यावर आता आरोप ठेवले गेले आहेत त्या चंदा कोचर यासुध्दा अशाच प्रतिष्ठित बँकर्स होत्या. त्यांच्याविषयी कोणालाही शंका येण्याचेही कारण नव्हते. परंतु व्हिडीओकॉन कंपनीला १७ हजारकोटीचे कर्ज देताना त्यांच्या पतीच्या कंपनीला व्हिडीओकॉनने ६४ कोटी रुपयांची मदत केल्याचे प्रकरण समोर आले आणि एकमेकांमधील हितसंबंधांची माहिती उजेडात आली. याच प्रकरणात इतरही काही बँकर्सची नावे घेतली गेली आहेत. नावे घेतली जाणे म्हणजे ते लोक दोषी आहेत असा त्याचा अर्थ होत नाही. परंतु हा सगळा व्यवहार होत असताना त्यांचा कुठे ना कुठे संबंध आल्याचे सीबीआयच्या लक्षात आले असू शकते. केवळ सीबीआयने त्यांची नावे घेतल्यामुळे अचानक बँकींग पध्दतीवरच परिणाम होण्याची भीती अरुण जेटली यांना वाटावी हेही मोठे धक्कादायक ठरते. समाजामध्ये अनेक प्रतिष्ठित लोक असतात परंतु एखाद्या प्रकरणामध्ये जेव्हा त्यांचे नाव घेतले जाते त्यावेळी सत्ताधाऱ्यांपैकी कोणालाही खेद वा खंत वाटत नाही. मात्र आर्थिक क्षेत्राशी संबंधित ही नावे समोर आल्याबरोबर जेटलींनी त्यांची एवढी बाजू घेण्याचे तसे कारणही नव्हते. आणि जरी सीबीआयच्या कामाबद्दल त्यांना तक्रार होती तर त्यांनी ती सरकारी स्तरावरूनच हाताळायला हवी होती. त्यांनी त्याची जाहीर वाच्यता केल्यामुळे सीबीआय आणि अर्थकारणातील हितसंबंध अशी एक नवीन चर्चा सुरु होऊ शकते.

### तपासाविषयीचा अविश्वास

मात्र यानिमित्ताने सीबीआयच्या कार्यपध्दतीबद्दल भले मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे आणि मग अशा परिस्थितीत इतर अनेक प्रकरणांमध्येसुध्दा सीबीआयने सुरु केलेल्या कारवाईबद्दल शंका उपस्थित होऊ शकते. अनेक राजकीय नेत्यांविरुध्द सीबीआयने आरोपपत्र दाखल केले आहे त्यामागे राजकीय सूडबुध्दी असू शकते. याचा अर्थ सीबीआयकडून होणारा तपास निष्पक्ष नाही. त्यात मोठ्या प्रमाणावर राजकीय हस्तक्षेप होतो. हेदेखील यानिमित्ताने स्पष्ट होते. आता तर दस्तुरखुद्द एका ज्येष्ठ मंत्र्यानेच सीबीआयला दोषी ठरवल्यामुळे या यंत्रणेची वरपासून खालपर्यंत संपूर्ण पुनर्रचना करणे क्रमप्राप्त ठरते. किंबहुना तशी मागणी झाली पाहिजे. कारण दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वादामुळे सीबीआयचे पितळ उघडे पडले आहेच आणि आता सीबीआयमध्ये मनमानी केली जाते. याबद्दल कोणतीही शंका राहिलेली नाही. मध्यवर्ती आणि अत्यंत महत्वाच्या आणि तितक्याच संवेदनशील प्रकरणांचा तपास करणारी ही यंत्रणा सगळ्या बाजूंनीच बरबटलेली असेल तर ती अत्यंत चिंताजनक ठरते. आता यापुढे सीबीआयकडून केल्या जाणाऱ्या तपासावर कितपत विश्वास ठेवायचा असाच वारंवार प्रश्न निर्माण होत राहील. म्हणजे जेटलींच्या आरोपानंतर पुन्हा एकदा पंतप्रधानांनीच लक्ष घालून या यंत्रणेचा नव्याने उध्दार करण्याची वेळ आली आहे.